# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये रुजविताना उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे

संशोधकाचे नाव
श्रीम. मनिषा अण्णासाहेब रहाणे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्राचार्य मा. डॉ. दादासाहेब मोरे
*(एम.एस्सी.एम.एड.पी.एच.डी)*
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
अभ्यासकेंद्र येवला 54499

*सारांश :*

*प्राथमिक स्तरावर जीवन कौशल्य शिक्षण हे मुलांमध्ये सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. यामध्ये विविध दहा कौशल्यांचा समावेश आहे जे विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील आव्हानांना तोंड देण्यास,लवचिकता निर्माण करण्यास आणि त्यांचे परस्पर संबंध वाढविण्यास सक्षम करतात. अभ्यासक्रमात संवाद, समस्या सोडवणे, प्रकल्प, चिकित्सक विचारसरणी आणि भावनिक बुद्धिमत्ता यासारख्या विविध कृती व उपक्रमांचा समावेश करून, शिक्षक विद्यार्थ्यांना वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील यशासाठी आवश्यक असलेल्या साधनांनी सुसज्ज करू शकतात. जीवन कौशल्ये शिक्षण केवळ शैक्षणिक कामगिरीला प्रोत्साहन देत नाही तर विद्यार्थ्यांना समाजाचे जबाबदार आणि सक्रिय नागरिक बनण्यासाठी देखील तयार करतो. त्याचबरोबर बालपणापासून जीवन कौशल्यांचे शिक्षण सकारात्मक वर्तनाला प्रोत्साहन देऊन सर्वांगीण व्यक्तिमत्व घडवते. ज्यामुळे जीवन कौशल्ये शिक्षण प्राथमिक शिक्षणाचा एक महत्त्वाचा घटक बनते.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द** : प्राथमिक स्तर, जीवन कौशल्ये, उपक्रम

**प्रस्तावना:**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. राष्ट्रीय उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी त्या अनुषंगाने अभ्यासक्रमाची निश्चिती केली जाते. सध्याच्या बदलत्या युगात विद्यार्थ्यांना बालकेंद्रीत अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. आज जगातील सर्वच प्रगत देशांमध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सार्वत्रिक आहे. प्राथमिक शिक्षण ही एक प्रत्येक मुलाची मूलभूत व अत्यावश्यक गरज आहे. त्यामुळे आपल्या देशात भारतीय राज्यघटनेच्या 45 व्या कलमानुसार प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. आपल्या देशाला 1960 पर्यंत मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते, परंतु अनेक प्रकारच्या समस्यांमुळे अपेक्षित प्रमाणात शैक्षणिक उद्दिष्ट साध्य झाले नाही.

प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्राथमिक शिक्षणात मोठ्या प्रमाणात संख्यात्मक वाढ

करण्यात आली. मात्र, दरम्यानच्या काळात प्राथमिक शिक्षणामध्ये फक्त संख्यात्मक वाढीकडे लक्ष दिले गेले. परिणामी, गुणात्मक वाढीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे अपेक्षित प्रमाणात साध्य झाली नाहीत. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असणार्या बाबींकडे आवश्यक तितके लक्ष देण्यात आले नाही. परिणामी, प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी आवश्यक कौशल्ये प्राप्त करू शकले नाहीत. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे आवश्यक कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित झाल्यामुळे त्यांचा विकासाचा स्तर समान राहील. तसेच राष्ट्रीय शिक्षणाचा दर्जा उंचावेल म्हणून जीवन कौशल्यांचा विकास करण्यासाठी शालेय परिसर, शैक्षणिक सुविधांची उपलब्धता, शालेय साहित्य, सर्वंकष मूल्यमापन प्रणाली आणि सुयोग्य अध्यापन पद्धतींचा वापर या सर्व बाबींवर भर देण्यात येत आहे.

**गरज व महत्त्वः**

प्राथमिक शिक्षण हे विकासाचे लक्षण आहे असे म्हटले जाते. म्हणून प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी कौशल्यात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.

शिक्षणाच्या पुढील व्याख्यांवरून शिक्षणाचा अर्थ स्पष्ट होतो.

1. शिक्षण म्हणजे सुसंस्कार.
2. शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास.
3. गुरुने उपदेश करून विद्यार्थ्याच्या वर्तनात इष्ट तो बदल घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय.
4. शिक्षण म्हणजे मनुष्यातील अभिजात पूर्णत्वाचे प्रकटीकरण.

वरील शिक्षणाच्या व्याख्यांवरून असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी केवळ माहिती पुरवून, ज्ञान देऊन, पाठांतर करून चालणार नाही तर मिळवलेल्या माहितीचे व्यावहारिक जीवनात उपयोग करण्याचे कौशल्ये देखील यावे लागेल. तरच मिळालेल्या ज्ञानाचे, माहितीचे, कौशल्यांचे ज्ञानात रूपांतर होऊन विद्यार्थ्यांमध्ये विशेष क्षमतांचा विकास . म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करावी ही अपेक्षा असते. त्यासाठी आजच्या स्थितीला प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये जीवन कौशल्यांविषयी जाणीव व जागृती असणे गरजेचे आहे.

**गृहितकेः**

1. विविध शालेय विषयाच्या आशयातून विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये रुजविता येतात.
2. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना सहशालेय कार्यक्रमांमध्ये, उपक्रमांमध्ये सहभागी होणे आवडते.
3. प्रत्यक्ष कृतीतून, अनुभवातून मिळणारे ज्ञान हे चिरकाल टिकणारे असते.

**उद्दिष्टे :**

1. जीवन कौशल्ये शिक्षण या घटकाची संकल्पना समजून घेणे.
2. जीवन कौशल्ये शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
3. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्ये शिक्षणाची सद्यस्थिती अभ्यासणे.

**संशोधन पद्धतीः**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सविस्तर विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा गुणात्मक स्वरुपाचा असल्याने तो दुय्यम स्रोतांवर आधारित आहे. त्यामुळे करून विविध संदर्भग्रंथ, मासिके,

वर्तमानपत्रे, नियतकालिकांमध्ये प्रकाशित शोधनिबंध, नियतकालिकांमध्ये प्रकाशित लेख, विविध संकेतस्थळे याद्वारे संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची मांडणी करण्यात आली आहे.

**उद्दिष्टांनुसार विश्लेषण :**

1) **जीवन कौशल्ये शिक्षण संकल्पना :**

जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या स्वतःच्या बौद्धिक,मानसिक आणि शारीरिक क्षमतांचा सर्वोत्तम वापर करून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास होय. जीवन कौशल्ये ही व्यक्तीला दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आहेत. जीवन कौशल्ये ही अशी कौशल्ये आहेत ज्याद्वारे एखादी व्यक्ती दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी आणि त्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी त्याच्यामध्ये असणांया ज्ञान,शक्ती, क्षमता आणि अभियोग्यतेचा सकारात्मक पद्धतीने वापर करते.

जागतिक आरोग्य संघटनेने 1997 मध्ये दहा जीवन कौशल्ये निश्चित केलेली आहेत. त्यामध्ये 'स्व'ची जाणीव, समानानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, परिणामकारक संप्रेषण, व्यक्ती– व्यक्ती मधील सहसंबंध, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, भावनांचे समायोजन, ताणतणावांचे समायोजन यांचा समावेश आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये वरील जीवन कौशल्य कमी अधिक प्रमाणात असतात. ही कौशल्य व्यक्तीच्या विचारांशी, भावनांशी आणि वर्तनाशी संबंधित असतात. जो कोणी व्यक्ती या कौशल्यावर प्रभुत्व संपादन करेल त्याचे व्यक्तिमत्त्व निश्चितपणे विकसित होऊन जीवन देखील समृद्ध होते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या देशात विविध पातळ्यावरून सर्वंकष प्रयत्न सातत्याने होत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्ययन अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती यामध्ये बदलत्या काळानुरूप सुसंगतपणे बदल होत आहेत. आजच्या आधुनिक युगात मानवाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. शिक्षणामुळे या सर्व समस्यांना यशस्वीपणे सामोरे जाता आले पाहिजे. जर विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यंबाबत जागृती झाली नाही तर भविष्यात अनेक प्रश्न निर्माण होतील. भविष्यातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षण हे आजच्या युगातील शिक्षण पद्धतीमध्ये अतिशय महत्त्वाचे व गरजेचे आहे.

2) **जीवन कौशल्ये या घटकाची शिक्षणातील ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

- **गुरुकुल शिक्षण पद्धती** :प्राचीन काळात भारतामध्ये गुरुकुल शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. या शिक्षण पद्धतीमध्ये ज्ञानात्मक शिक्षणाबरोबर चारित्र्यावर, मूल्यसंवर्धनावर आणि व्यक्तिमत्व विकसनावर जास्त भर असे. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांना कौशल्ये आधारित जीवनोपयोगी शिक्षण दिले जात असे.
- **युनेस्को** :युनेस्को जीवन कौशल्यांना महत्त्व देणारी एक जागतिक संस्था आहे. युनेस्कोचा विश्वास आहे की शिक्षण हे जीवनभर सर्वांसाठी मानवी हक्क आहे. " शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळविणे नव्हे तर कौशल्यावर प्रभुत्व मिळवून समाजात स्वतःचे वेगळे असे अस्तित्व निर्माण करणे होय " असे युनेस्कोने म्हटले आहे. शिक्षणातून मूलभूत मानवी गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व कौशल्यांचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय मानले गेले आहे.
- **जागतिक आरोग्य संघटना** : जागतिक आरोग्य संघटनेने 1997 मध्ये दहा मूलभूत कौशल्य निश्चित केली

आहेत. जागतिक आरोग्य संघटना जीवन कौशल्ये शिक्षण आणि विकासावर लक्ष केंद्रित करते. या जीवन कौशल्यांवर आधारित आता एकविसाव्या शतकातील आवश्यक कौशल्यांचे विकसन केले आहे.

- **भारतीय संविधान** : भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांविषयीच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहे. त्याची पूर्ती होण्यासाठी जीवन कौशल्य हे शिक्षणामध्ये आवश्यक आहेत. भारतीय संविधान जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार आणि जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक असलेली मदत प्रदान करते. जीवन कौशल्ये नागरिकांना संविधानाने दिलेले अधिकार प्रभावीपणे वापरण्यासाठी आणि एक चांगले जीवन जगण्यासाठी मदत करतात.
- **कोठारी आयोग (1964–1966):** कोठारी आयोगाने शिक्षणामध्ये जीवन कौशल्ये शिकवण्यावर भर दिला. या आयोगाच्या मते, शिक्षण केवळ ज्ञानाची भरच नसावे, तर विद्यार्थ्यांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांनी देखील सक्षम करायला हवे. कोठारी आयोगाने शिक्षणामध्ये जीवन कौशल्ये शिकवण्यावर भर दिला, ज्यामुळे भारतीय शिक्षण प्रणाली अधिक व्यापक आणि प्रभावी झाली.
- **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005** : राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 या अभ्यासक्रम आराखड्याच्या मसुद्याची सुरुवातच जीवन कौशल्य दर्शक आहे. तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात अनेक प्रकरणातून जीवन कौशल्यांचा विकासावर दिला आहे.
- **बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा 2009** :बालकांचा मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अधिकार या कायद्यानुसार बदलत्या शिक्षण पद्धतीची ओळख करून घेण्याची व ही कौशल्य शालेय व्यवहार उतरण्याची गरज आहे असे निर्देश दिले आहेत. या कायद्यामध्ये देखील जीवन कौशल्यविषयक शिक्षणाचा उल्लेख केला आहे.
- **राज्य अभ्यासक्रम आराखडा 2010** :विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात उपयोगी पडेल असे ज्ञान, कौशल्य आणि वृत्ती विकसित करायला मदत करणे हा ज्ञानसंरचनावादाचा आधार राज्य अभ्यासक्रम आराखडा निर्मितीमध्ये घेतलेला आहे.
- **राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020** : राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 जीवन कौशल्ये शिक्षणाला महत्त्व देते. हे धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करण्यासाठी जीवन कौशल्ये शिक्षणावर भर देते. एकविसाव्या शतकातील आवश्यक असणारे जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध प्रकारच्या कृती व उपक्रम यांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश असावा असे मत मांडले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे शिक्षण पद्धतीत बदल घडवून आणते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी आणि संबंधित शिक्षण मिळेल. जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांना या बदलांशी जुळवून घेण्यासाठी मदत करतात. हे धोरण जीवन कौशल्ये अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची शिफारस करते. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या जीवनातील वेगवेगळ्या समस्यांना प्रभावीपणे तोंड देऊ शकतील.

त्यानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) 2023 नुसार जीवन कौशल्यांचा समावेश असलेल्या विविध घटकांचा समावेश पाठ्यक्रमात असणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार, शिक्षण केवळ माहिती देण्यापुरते मर्यादित नसावे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. जीवन कौशल्ये शिक्षण व्यक्तीच्या

सर्वांगीण विकासाला सहाय्य करते.

3) **प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्ये या घटकाची सद्यस्थिती :**

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्ये या घटकाची सद्यस्थिती सकारात्मक आहे. जीवन कौशल्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आणि गरज ओळखून अनेक शाळांमध्ये जीवन कौशल्ये आधारित शिक्षणावर भर दिला जात आहे.

- **आधुनिक शिक्षणप्रणालीत समावेश** :एकविसाव्या शतकातील जीवन कौशल्ये शिक्षण शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे,ज्यामुळे विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील समस्यांना तोंड देण्यासाठी आवश्यक क्षमता विकसित करता येत आहे. त्याचबरोबर जीवन कौशल्ये शिक्षणासाठी अनेक मार्गदर्शिका आणि अभ्यासक्रम तयार केले आहेत, जे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत.
- **शिक्षक प्रशिक्षण** : जीवन कौशल्यांच्या प्रभावी शिक्षणासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जात आहे, जेणेकरून ते विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करू शकतील.
- **शैक्षणिक संस्थांचा सहभाग** : जीवन कौशल्ये शिक्षणाचे महत्त्व ओळखून अनेक शैक्षणिक संस्था यासंदर्भात विविध कृतीकार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करतात.
- **संसाधने उपलब्धता** :जीवन कौशल्ये शिक्षण संबंधित अनेक संसाधने जसे कृतिकार्यक्रम, कृतीपुस्तिका, प्रकल्प आणि मार्गदर्शिका सहजपणे उपलब्ध आहेत.
- **परिणाम** :जीवन कौशल्ये शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहेत, जसे की 'स्व' ची जाणीव, आत्मविश्वास आणि समस्या निराकरण क्षमता यामध्ये निश्चितपणे वाढझाल्याचे दिसून येते.

एकंदरीत, प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्ये शिक्षणाची सद्यस्थिती सकारात्मक आहे. या क्षेत्रात अधिक विकास होण्यासाठी शाळा, शिक्षक आणि पालकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

1. भितांडे वि. रा. (जून 2007), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे रू नित्यनुतन प्रकाशन,पृष्ठ क्रमांक–68.
2. मगरे सुनिता, डॉ.चट्टे राम, जीवन कौशल्ये एम. ए. शिक्षणशास्त्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,नाशिक
3. म्हस्के ए.टी.(2007), शैक्षणिक संख्याशास्त्र, इनसाईट प्रकाशन ,नाशिक
4. मुळे रा.श.,उमाठे वि.तु.(1988),शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,औरंगाबाद रूविद्या बुक्स
5. नरवणे मीनल, (2001), भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या,पुणेरू नूतन प्रकाशन ,पृष्ठ क्रमांक 50–57.
6. पारसनीस हेमलता,(2006), शैक्षणिक संशोधन माहितीसंकलन तंत्रे व साधने,नित्यनुतन प्रकाशन,पुणे
7. पाटील व्ही.एन.(जुलै 2011), जीवन कौशल्य शिक्षण आणि ज्ञानाधिष्ठित समाज,शिक्षण आणि समाज
8. 'जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका' इयत्ता 1 ली ते 4 थी (2008), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे 30.
9. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (2005) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005
10. भारत सरकार. (2021), राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020,.मानव संसाधन विकास मंत्रालय.